ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २१७ • बुधवार दि.२७ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## विशेष मतदार पुनर्पडताळणी मोहीम वैध

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय



निवडणूक आयोगाला मतदार याद्या शुद्ध आणि निष्पक्ष ठेवण्यासाठी विशेष प्रक्रिया राबविण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नवी दिल्ली: केंद्रीय निवडणूक आयोगाच्यावतीन निवडणुकीपूर्वी सुरु करण्यात आलेली विशेष सखोल मतदार पुनर्पडताळणी मोहिम अर्थात एसआयआर वैध व घटनात्मक असल्याचा महत्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वातील खंडपीठाने दिला आहे. या निर्णयामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाला मतदार याद्या शुद्ध आणि निष्पक्ष ठेवण्यासाठी विशेष प्रक्रिया राबविण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी सुरु असलेल्या विशेष सखोल मतदार पुनर्पडताळणी मोहिमे विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विविध याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने आज महत्वपूर्ण निकाल घोषीत केला आहे. निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था असून निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे अधिकार आयोगाला आहेत. विशेष परिस्थितीत स्वतंत्र प्रक्रिया राबविणे संविधान आणि कायद्याच्या विरोधात नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांनी दावा केला होता की, ही प्रक्रिया सामान्य मतदार नोंदणी पद्धतीपेक्षा वेगळी असून त्यामुळे मतदारांच्या मूलभूत अधिकारांवर परिणाम होऊ शकतो.या मोहिमेनुसार, ज्या मतदारांचे नाव २००२ किंवा काही राज्यांमध्ये २००३ च्या मतदार याद्यांमध्ये नव्हते, त्यांना त्या जुन्या याद्यांमध्ये नाव असलेल्या व्यक्तीशी आपले कौटुंबिक नाते सिद्ध करावे लागणार आहे. याचिकाकर्त्यांनी या अटीला जाचक ठरवत ती संविधानातील अनुच्छेद तसेच लोकप्रतिनिधी कायदा १९५० च्या विरोधात असल्याचा दावा केला होता. सुनावणी दरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, गरीब, मजूर, स्थलांतरित आणि उपेक्षित घटकांतील अनेक नागरिकांकडे दोन दशकांपूर्वीचे कागदोपत्री पुरावे उपलब्ध नसतात. त्यामुळे अनेक पात्र नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू शकतात.दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी काही अंतरिम निर्देशही दिले होते. सुरुवातीला पडताळणीसाठी ११ कागदपत्रे निश्चित करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाच्या सूचनेनंतर अधिकृत ओळखपत्र पडताळणीचाही या प्रक्रियेत समावेश करण्यात आला आहे.

## जीवनशैलीत महत्वाचे बदल करा-पंतप्रधान नरेंद्र मोदी

नवी दिल्ली: सध्या देशात कडाक्याच्या उन्हामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना दैनंदिन जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल करण्याचा सल्ला देत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.



देशातील अनेक भागांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या तापमानामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, आकाशातून जणू काही अग्नीचा वर्षाव होत आहे, अशा शब्दांत उष्णतेच्या तीव्रतेचे वर्णन करत पंतप्रधान मोदी यांनी नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे म्हटले आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण योग्य राखण्यासाठी प्रत्येकाने पुरेसे पाणी प्यावे आणि घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी, यावर त्यांनी विशेष भर दिला.दुपारच्या कडाक्याच्या उन्हात विनाकारण बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करताना त्यांनी विशेषतः ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्याची गरज अधोरेखित केली. घरातील आई-वडील, आजी-आजोबा आणि इतर वृद्ध व्यक्तींना उष्माघाताचा धोका अधिक असतो. त्यामुळे त्यांची नियमित विचारपूस करावी, त्यांना पुरेसे पाणी पिण्यास सांगावे आणि शक्य तितकी विश्रांती घेण्याचा सल्ला द्यावा, असेही पंतप्रधानांनी नमूद पान ४ वर

## विधानपरिषदेच्या जागावाटपावरुन महायुतीत खदखद

### शिंदेसेना ७ जागांवर ठाम;दिल्लीकडे साऱ्यांच्या नजरा

मुंबई/प्रतिनिधी- विधानपरिषद निवडणुकीतील महायुतीच्या जागा वाटपाचा तिढा दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होत चालला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सात जागांवर ठाम भूमिका घेत भाजपचा प्रस्ताव फेटाळल्याची माहिती समोर आली आहे. दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही दोन जागांवर दावा कायम ठेवल्याने हा वाद आता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दरबारात पोहोचला आहे. त्यामुळे दिल्लीकडे महायुतीतील सर्व घटक पक्ष व इच्छुक उमेदवारांच्या नजरा लागून आहेत.

विधानपरिषदेच्या १८ जागांच्या निवडणुकीपूर्वी महायुतीत जागावाटपावरून मोठा संघर्ष उफाळून आला असून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे विधानसभेवर निवडून गेल्यामुळे रिक्त झालेल्या नागपूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेचाही यात समावेश आहे. भाजपकडून शिंदे गटाला चार जागांचा प्रस्ताव देण्यात आला होता. मात्र, एकनाथ शिंदे यांनी सात जागांवर ठाम भूमिका घेत हा प्रस्ताव सरळ नाकारला. तर राष्ट्रवादी काँग्रेसला एक जागा देण्यास भाजप तयार असल्याचे सांगितले जात असले तरी अजित पवार गटाने दोन जागांचा आग्रह कायम ठेवला आहे.सोमवारी रात्री वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीला भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. बैठकीत शिंदे यांनी सात जागांवरील दावा कायम ठेवत माघार घेण्यास नकार दिल्यामुळे कोणताही तोडगा निघू शकला नाही.यानंतर रवींद्र चव्हाण आणि बावनकुळे यांनी शिंदे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरल्याची माहिती आहे.

## माजी मुख्यमंत्र्यांच्या घरावर ईडीचे छापे

### केरळमधील राजकारण तापले

नवी दिल्ली:केरळचे माजी मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांची मुलगी टी. वीणा विजयन यांच्या एक्झालॉजिक सोल्युशन्स या आयटी कँपनीशी संबंधित कथित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाच्या तपासाअंतर्गत माजी मुख्यमंत्री विजयन यांच्या घरासह बारा ठिकाणी छापे ईडीच्यावतीने टाकण्यात आले आहेत. प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्ड्रिंग कायदा (पीएमएलए) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून सकाळपासून ईडीची पथके विविध ठिकाणी तपास करीत आहेत.

कोचीन मिनरल्स अँड रुटाईल लिमिटेड (सीएमआरएल) आणि एक्झालॉजिक सोल्युशन्स यांच्यातील आर्थिक व्यवहारांबाबत ईडीकडून तपास सुरू आहे. २०१८ ते २०१९ या कालावधीत सीएमआरएल या खासगी कँपनीकडून वीणा विजयन यांच्या आयटी कँपनीला तब्बल १.७२ कोटी रुपयांचे पेमेंट करण्यात आल्याचा आरोप आहे. मात्र, त्याबदल्यात कोणतीही सेवा पुरविण्यात आली नसल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला आहे. त्यामुळे या व्यवहारांमागे आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्ड्रिंगचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.या प्रकरणात केरळम उच्च न्यायालयाने मंगळवारी सीएमआरएल कँपनीची याचिका फेटाळून लावली होती. ईडीच्या कारवाईला आव्हान देत तपास रद्द करण्याची मागणी कँपनीने केली होती. मात्र न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर अवघ्या काही तासांत ईडीने छापेमारीची कारवाई सुरू केली. यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे.ईडीने २०२४ मध्ये या प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. दरम्यान, सिरियस फ्रॉड पान ४ वर

## उमेश दळवी यांच्या हत्येचा मातंग समाजातर्फे तीव्र निषेध

किनवट/प्रतिनिधी- बीड येथे मातंग समाजातील तरुण उमेश दळवी यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ किनवट येथे मातंग समाज बांधव आणि जातीअंत संघर्ष समितीच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयात आज (२७ मे) निवेदन देण्यात आले. आरोपींवर तात्काळ कठोर कारवाई करून फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

उमेश दळवी यांची काही समाजकंटकांनी अमानुषपणे हत्या केली असून ही घटना केवळ एका व्यक्तीची हत्या नसून मानवतेला काळिमा फासणारी आहे. या घटनेमुळे मातंग समाजात तीव्र संतापाची लाट पसरली असून राज्यातील दलित समाजामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अशा घटना घडणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगत दोषींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. तसेच पीडित कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत आणि संरक्षण देण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली. उमेश दळवी हत्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालववा.दोषींना फाशीची शिक्षा द्यावी. पीडित कुटुंबाला ५० लाख रुपयांची आर्थिक मदत व कुटुंबातील एका सदस्यास शासकीय नोकरी द्यावी. पीडित कुटुंबाला पोलिस संरक्षण देण्यात यावे. या मागण्या मान्य न झाल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आलाय. माजी नगराध्यक्ष के.मूर्ती, प्राचार्य डॉ.आनंद भालेराव, कॉम्रेड जनार्दन काळे, माजी नगरसेवक लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, गंगाधर मुकेनपेल्लीवार, दयानंद काळे, बालाजी कांबळे, बालाजी गायकवाड, अॅड.मिलिंद सरपे यांच्यासह इतरांच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले आहे.

## असरजन नाका ते वाघाळा डांबरीकरण रस्ता ड्रेनेज खोदकामामुळे नादुरुस्त

नांदेड/प्रतिनिधी- प्रभाग क्रमांक २० मधील असरजन नाका ते वाघाळा ड्रेनेज लाईन खोदल्यामुळे चांगला डांबरीकरण रस्ता नादुरुस्त झाल्यामुळे गेल्या वर्षापासून परिसरातील अनेक भागातील नागरीकांचे बेहाल होत असुन तात्काळ रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी मनपा आयुक्त, महापौर व परिसरातील सर्व नगरसेवक यांच्याकडे परिसरातील नागरिकांनी केली असून या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याने आगामी पावसाळ्यात मात्र नागरीकांसह वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागणार आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका प्रभाग क्रमांक २० मधील त्रिमूर्तीनगर, विठ्ठलनगर, साईबाबानगर, श्रीरामनगर, सिद्धिविनायकनगर येथे जाण्यासाठी रस्त्याची अशी दुरवस्था झाली आहे सदरील परिसरात पोलीस विभागातील कर्मचारी, वैद्यकीय सेवा, डॉक्टर, सैन्य दलातील सैनिकाचे कुटुंबीय राहत असून नादुरुस्त रस्ता मुळे नोकरी वरील कर्मचारी, शालेय विद्यार्थी व परिसरातील नागरीकांचे येणं जाणे यासाठी बेहाल होत आहेत. ड्रेनेज लाईन टाकली परंतु कनेक्शनही देण्यात आली नाही, गेल्या अनेक दिवसांपुर्वी परिसरातील नागरिकांनी स्वखर्चाने नागरीकांना रस्ता दुरुस्त केला होता; परंतू मोठं मोठे वाहनांची येजा चालू असल्याने पुन्हा रस्ता नादुरुस्त झाला आहे. गेल्या एक वर्षापासून शारदा कन्स्ट्रक्शन यांनी ड्रेनज लाईनसाठी चांगला रस्ता मधोमध ड्रेनेज लाईन साठी खोदण्यात आला आहे. परंतु सदरील रस्त्याची दुरुस्ती न करता तसाच पान ४ वर



## कंधार तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात पैशाविना कागदच हालेना...

### तोतया कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून नागरिक व राशन दुकानदारांची लूट?

कंधार/प्रतिनिधी- तहसीलदार रामेश्वर गोरे यांचा कारभार चांगला चालु असताना तहसीलदार यांच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन पुरवठा अधिकारी यांनी मनमानी कारभार चालवला आहे.राशन दुकानदारांना तर सोडाच परंतु सामान्य लोकांनाही साध्या कामासाठी पैसे घेतल्या शिवाय काम होत नसल्याच्या अनेक तक्रारी समोर येत आहेत. कामाच्या माध्यमातून पैसे वसुली करण्यासाठी पुरवठा अधिकाऱ्यांनी एक तोतया कर्मचारीही ठेवला असून त्यांच्या माध्यमातून ही लूट चालू असल्याची जोरदार चर्चा चालू आहे.

कंधार तालुक्यातील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात अनधिकृत मध्यस्थांचा (तोतया कर्मचाऱ्यांचा मनमानी कारभार वाढला आहे. रेशनिंग, धान्य वाटप आणि दाखल्यांच्या कामांसाठी सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, 'तोतयाच्या' तावडीतून हा विभाग कधी मुक्त होणार.? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. संबंधित विभागाचे अधिकाऱ्यांच्या मर्जीतले तोतयाची मनमानी आणि नागरिकांची लूट केली जात आहे. पुरवठा विभागाशी संबंधित विविध शासकीय कामांसाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना थेट अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचू न देता, साहेबांच्या कृपेने मर्जीतले दलाल व तोतया कर्मचारी अडथळा ठरत आहेत. शिधापत्रिका (रेशन कार्ड) दुरुस्ती, नवीन नावाची नोंदणी, किंवा धान्याचे वाटप यांसारख्या कामांसाठी हे तोते नागरिकांकडून सर्रास पैशांची मागणी करतात. अधिकृत कर्मचारी नसतानाही, काही बाहेरील व्यक्ती शासकीय दप्तराची हाताळणी करत असल्याच्या धक्कादायक तक्रारी समोर आल्या आहेत.

**अधिकृत कर्मचाऱ्यांची अनास्था**

कार्यालयात पुरवठा निरीक्षक, अव्वल कारकून (महसूल सहायक) आणि इतर अधिकृत कर्मचारी नियुक्त असतानाही, त्यांच्या संगनमतानेच हे तोतया सक्रिय असल्याचा संशय नागरिकांना आहे. अनेकदा अधिकारी दौऱ्यावर किंवा बैठकांमध्ये असतात, या संधीचा फायदा घेत हे अनधिकृत एजंट कार्यालयावर पूर्ण नियंत्रण मिळवतात. या गंभीर प्रकारामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असून, शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचत नाही. जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून, पुरवठा विभागात अनधिकृत व्यक्तींच्या प्रवेशावर कायमची बंदी घालावी. तसेच, तोतयाना पाठीशी घालणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. पुरवठा विभाग पूर्णपणे पारदर्शक आणि तोत्यांच्या तावडीतून मुक्त होणार का, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे.

पुरवठा विभाग अधिकाऱ्याचे काही दिवसापूर्वी एक अपघाताचे प्रकरण झाले होते हे अपघाताचे प्रकरण थोडीफार तडजोड करून मिटवल्याच चर्चा होती. परंतु हा अपघात अद्यापही पुरवठा अधिकारी यांच्या डोक्यातून गेला नाही. अपघाताचे नाव पुढे करून राशन दुकान वाल्याकडून दोन लाख रुपये जमा करून द्या अशी मागणी करत असल्याचेही जोरदार चर्चा चालू आहे. विशेष म्हणजे राशन दुकान वाल्यांनाही गोदाम मधूनच एका पोत्यात दोन किलो माल कमी येत असुन हमालीचा बोजा ही राशेन दुकान चालकांवर असल्याने राशेन दुकान चालकही पुरवठा अधिकाऱ्याच्या वसुली शाहीला कंटाळले असल्याचीही दबक्या आवाजात चर्चा चालू आहे.

# नफ्याची भरारी आणि महागाईचा भार

**देशाच्या आर्थिक विकासाचे मोजमाप अनेकदा उद्योगांच्या वाढत्या नफ्यावर, उत्पादनातील वाढीवर आणि बाजारपेठेतील तेजीवर केले जाते. मोठ्या कंपन्या विक्रमी नफा कमावत असतील तर अर्थव्यवस्था योग्य दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र उभे केले जाते. मात्र विकासाची ही आकडेवारी समाजाच्या तळागाळातील माणसाच्या जीवनाशी जुळत नसेल, तर त्या प्रगतीचे स्वरूप प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरते. सध्या देशात असेच चित्र पाहायला मिळत आहे. एका बाजूला तेल कंपन्या मोठ्या प्रमाणावर नफा कमावत आहेत, तर दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिक महागाईच्या वाढत्या ओझ्याखाली दबत चालला आहे. सन २०१४ नंतर तेल क्षेत्रातील सरकारी कंपन्यांनी सातत्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ मिळवला आहे. अलीकडील आर्थिक आकडेवारीनुसार देशातील प्रमुख तेल कंपन्यांनी एकत्रितपणे सुमारे ७७ हजार कोटी रुपयांहून अधिक नफा कमावला आहे. काही कंपन्यांच्या नफ्यात मागील वर्षांच्या तुलनेत लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. व्यवसायाच्या दृष्टीने नफा मिळवणे चुकीचे नाही; उलट कोणत्याही उद्योगाचे अस्तित्व आणि विस्तार नफ्यावरच अवलंबून असतो. मात्र जेव्हा हा नफा सामान्य ग्राहकांच्या खिशावर वाढत्या भाराच्या स्वरूपात उभा राहतो, तेव्हा त्याचे सामाजिक परिणाम तपासणे आवश्यक ठरते.इंधन हे आज केवळ वाहन चालविण्याचे साधन राहिलेले नाही. उद्योगधंदे, शेती, वाहतूक, व्यापार, उत्पादन आणि दैनंदिन जीवनातील जवळपास प्रत्येक क्षेत्र त्यावर अवलंबून आहे. त्यामुळे इंधनाच्या किंमतीत होणारा वाढता बदल हा थेट नागरिकांच्या जीवनावर परिणाम करणारा असतो. वाहतुकीचा खर्च वाढल्यामुळे कच्च्या मालाचा खर्च वाढतो. त्यातून उत्पादन खर्च वाढतो आणि शेवटी सर्व वस्तूंच्या किंमती वाढतात. परिणामी महागाईचे दुष्टचक्र निर्माण होते.तेल कंपन्यांनी कमावलेल्या नफ्यातील काही हिस्सा ग्राहकांच्या हितासाठी वापरला गेला, तर त्याचा मोठा दिलासा नागरिकांना मिळू शकतो. इंधनाचे दर कमी करण्यासाठी किंवा कर भारात सवलत देण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. कारण आर्थिक विकासाचा उद्देश केवळ कंपन्यांची आर्थिक ताकद वाढविणे नसून नागरिकांचे जीवनमान सुधारणे हा असायला हवा. अन्यथा उद्योगांच्या वाढत्या नफ्याचे आकडे आणि सामान्य नागरिकांची आर्थिक कोंडी यांच्यातील अंतर अधिक वाढत जाईल. याच वेळी राज्यात कांद्याच्या बाजारपेठेत दिसणारे चित्रही अनेक प्रश्न निर्माण करते. शेतकरी आपला माल बाजारात घेऊन जातो तेव्हा त्याला कांद्याला एक किंवा दोन रुपये प्रति किलो एवढाच दर मिळत असल्याच्या घटना घडत आहेत. शेतकरी मेहनत करतो, उत्पादनासाठी खर्च करतो, हवामानाच्या संकटांना तोंड देतो; मात्र त्याला आपल्या मालाचा योग्य मोबदला मिळत नाही. आश्चर्याची बाब म्हणजे दुसरीकडे किरकोळ बाजारात तोच कांदा ग्राहकांना सोळा ते सतरा रुपये प्रति किलो दराने खरेदी करावा लागतो.ही परिस्थिती उत्पादन आणि ग्राहक यांच्यामधील असमतोल स्पष्ट करणारी आहे. शेतकऱ्याला योग्य मोबदला मिळत नाही आणि ग्राहकांनाही कमी दरात वस्तू मिळत नाहीत. मग या दोघांच्या मधील वाढलेला आर्थिक लाभ नेमका कोणाच्या हाती जातो?, हा प्रश्न निर्माण होतो. बाजारव्यवस्थेतील मध्यस्थांची वाढती भूमिका आणि नफा कमावण्याची स्पर्धा यामुळे हा तफावत वाढताना दिसतो.भारतीय राज्यशास्त्रात आणि इतिहासात एक जुनी म्हण आहे ''राजा व्यापारी झाला की, प्रजा भिकारी होते.'' या म्हणीचा अर्थ केवळ शासनव्यवस्थेशी मर्यादित नाही, तर अर्थव्यवस्थेतील असमतोलालाही लागू पडतो. जेव्हा नफा, बाजार आणि आर्थिक हितसंबंध हेच केंद्रस्थानी राहतात आणि सामान्य नागरिक दुय्यम ठरतो, तेव्हा समाजात विषमता वाढते. आर्थिक प्रगतीचे फायदे मोजक्या घटकांपुरते मर्यादित राहतात.देशाचा विकास हा केवळ आर्थिक अहवालातील आकडे वाढण्यात नसतो; तर शेतकऱ्याला योग्य भाव, ग्राहकाला वाजवी दर आणि नागरिकाला आर्थिक सुरक्षितता मिळण्यात असतो. विकासाचे चक्र सर्वांच्या हिताचे असेल, तरच ते खऱ्या अर्थाने प्रगतीचे प्रतीक ठरेल. अन्यथा वाढत्या नफ्याच्या आकड्यांच्या मागे सामान्य माणसाचे वास्तव मात्र अधिक कठीण होत जाईल.**

# उद्योगधंदे उभारता येतात, पण...

**अंकुश शिंगाडे**
नागपूर.




बेरोजगारी ही सध्या एक भारत देशातील भीषण समस्या आहे. प्रत्येकांच्या हाताला काम मिळायलाच हवं. असं देशातील प्रत्येक माणसाचं म्हणणं. तसं तरुण खुश तर जनता खुश. मग सरकारही खुश आणि देशही खुश. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. परंतु सध्याची देशाची स्थिती तशी नाही. बेरोजगारी सतत वाढत चाललेली आहे. त्यामानानं सरकारी उद्योगधंदे नाहीत. उद्योगधंदे उभारता येवू शकतात. परंतु त्यात अनेक अडचणी आहेत व मुख्य अडचण आहे पैसा. तो पैसा राजकारणी मंडळी राजकारण करण्यासाठी वापरतात. ज्यातून उद्योगधंदे उभे राहात नाही व बेरोजगारीची भीषण समस्या निर्माण होत आहे.प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या धर्माला आज चिकटून आहेच. तसाच तो प्रत्येकच राजकीय पक्षालाही चिकटून आहेच. जे राजकीय पक्ष त्यांना आश्वासन देतात. काही आश्वासनाची परिपुर्ती करतात. देशात उद्योगधंदेही काढतात आणि असे उद्योगधंदे काढत असतांना गवगवा जास्त व कार्य कमी प्रमाणात करतात.


एक असाच विषय. काक्रोज जनता पार्टी का निर्माण झाली. हा माझा प्रश्न? त्यावर मी लिहिलं की देशात बेरोजगारी निर्माण झाली. लोकांना सरकारी नोकऱ्या मिळत नाही. बेरोजगार जास्त झाले. त्यामानानं उद्योगधंदे कमी झाले. देशात उद्योगधंदे निर्माण होत नाहीत. अन् होतात तर ते सरकारी उद्योगधंदे नसतात. त्यावर एका व्यक्तीचं वक्तव्य. वक्तव्य होत, 'आ. सर, आपण खरोखर अभ्यास केला आहे का की खरंच कामे मिळत नाही वगैरे? कामं म्हणजे काय, फक्त सरकारी कँम्नी मधेच करायला पाहिजे अशी कामं म्हणायची आहेत काय? कामं कोणत्याही स्वरुपाची का असेना, युवकांनी करायला हवीत. त्यासाठी चिडून जायला नकोच.'पुढील व्यक्तीमहोदयाचं त्यावर उत्तर. त्यावर मी म्हटलं की देशातील तरुणाई उच्च शिक्षण जर शिकली तर त्या उच्चशिक्षीत तरुणांनी चांगल्या नोकरीची अपेक्षा धरु नये काय? माझं मत होतं, चांगली नोकरी अर्थात सरकारी नोकरी. त्यावर उत्तर देत पुढील व्यक्तींचं म्हणणं. त्यांनी वेगवेगळी उदाहरणं दिलीत. त्यांनी उदाहरणं देवून म्हटलं. एवढे इन्फ्रास्ट्रक्चर उभं होत आहे तर ती कामे कोण करत आहेत? अजून तरी मशीन नाहीच. माणसंच आहेत.,हे ब्लिंकिट वगैरे सारखे ऑनलाईन प्लॅटफॉर्मला अनेक डिलिव्हरी बॉय लागतात. अगदी गावागावात पण. ती कामे कोण करत आहे? माणसंच ना.,सध्या उबर /भारत/ओला वगैरेचे ड्रायव्हर आणि त्यांची टॅक्सी मेन्टेन करणाऱ्या कँम्न्यांत कामे कोण करत आहे? माणसंच ना.,स्विगी/झोमॅटो वर खायच्या वस्तू विकणारे कोण आहेत? माणसंच ना.ही वर जी उदाहरणे दिली आहेत. त्यात चांगला बिझनेस आहे आणि लोक करत आहे. आपल्या माहितीत असलेली मुले स्वतः काही करत नाही आणि सरकारला उगाच ब्लेम करतात. त्याचं कारण म्हणजे बाहेरच्या विदेशी शत्रूंजवळून पैसे घेऊन फक्त भारतात कुठले तरी आंदोलन करु पाहणे, जेणेकरुन भारतात अशांतता पसरावी जेणेकरुन इथं जे बाहेरचे लोक इन्व्हेस्ट करत आहे ते बंद होईल.

जरा आजुबाजूच्या देशांचा अभ्यास करा. हेच करुन तिथल्या जेन जी ला उकसवण्यात आले आणि सरकार बदलण्यात आले. तुम्हाला वाटते आहे का की आपली जेन जी एवढी मूर्ख आहे की असे काही करेल? नाही करणार. कारण प्रत्येक तरुण पाहतो आहे भारताची बदललेली स्थिती. बदललेले त्याचे ग्लोबल स्थान. आज मी भारतीय म्हटले की कसे वागतात. विदेश मध्ये ते प्रत्येक जण बघत आहे. तुम्हाला जरी ही पार्टी योग्य वाटत असली तरी. ही पार्टी मुळात चुकीच्या वेळेस जन्माला आली आहे आणि चुकीच्या माणसाने बनवली आहे. जो स्वतः विदेशातच शिकतो.ते त्यांचं वक्तव्य. त्यावर उत्तर देत मी म्हटलं.ती पार्टी निर्माण व्हावी. असं मलाही वाटत नाही. परंतु सरकारी उद्योगधंदे निर्माण व्हावेत. असं मलाच नाही तर देशातील तळागाळातील प्रत्येक माणसांना वाटते. त्यांना खाजगीकरण नकोच वाटते. आपण जी उदाहरणे दिलीत. ती खाजगी कामधंद्याची दिलीत. ते नकोय इथल्या तरुणांना. कारण खाजगी कँम्न्या आज जरी जास्त दर देत असल्या तरी उद्या त्या देतीलच. याची शाश्वती नाही.ते माझं म्हणणं. त्यावर उत्तर देत ते व्यक्तिमत्व म्हणालं.

सरकारी उद्योग लावणे तेव्हाच शक्य असते. जेव्हा टॅक्समध्ये खूप पैसे एकत्र होत असेल. कारण एम्प्लॉयमेंट ही लाईफ टाइमची जबाबदारी होईल सरकारची. जास्तीचे सरकारी उद्योग नुकसानदायक आहेत. त्याची कारणे अनेक आहेत. अन् असे उद्योग वाढवून काय फायदा होणार देशाला? फायदा? नुकसान? जास्तीचे उद्योगधंदे उभारुन देशाला फायदा काय? जास्तीचे उद्योगधंदे उभारणे नुकसानदायक नाही काय? शिवाय टॅक्समध्ये खुप पैसे एकत्र होत असेल तर उद्योग उभारता येणे शक्य आहे. असं त्यांचं जे म्हणणं होतं. त्यावर उत्तर देणं मी योग्य समजलो नाही. कारण बोलण्या बोलण्यातून वाद चिघळत गेला असता. पार्टी राहिली जागच्या जाग्यावर. सरळ वैयक्तिक स्तरावर विचारांचं युद्ध छेडलं गेलं असतं.उद्योगधंदे, तेही सरकारी उद्योगधंदे उभारणे. ज्याला पैसा लागतो. उद्योगधंदे उभारण्यात अनेक ज्या अडचणी असतील. त्यातील मुख्य अडचण पैसाच. तसा गवगवा केला जात आहे की देशात पैसाच नाही. अन् कसा राहणार? कारण टॅक्स गोळा होत नाही. का बरं होत नाही टॅक्स गोळा? कारण आजही असे कितीतरी गर्भश्रीमंत लोकँ आहेत की त्यांच्यावर कितीतरी कोट्यवधीचे टॅक्स थांबलेले आहेत. जे वसूल केले जात नाहीत. वसूल होत नाहीत. ते वसूल करताही येतात. जर कडक कारवाई केली तर...जर त्यांचे बंगलेच सील करुन विकले गेले तर...परंतु कोण करणार कडक कारवाई? कारण त्यातील काही लोकँहे सत्ताधारी पार्टीचे सदस्य असतात. काही गुंडमवाली असतात, तर काही सेलिब्रेटी असतात. ज्यांना हेतुपुरस्सर सोडलं जातं. दुसरा मुद्दा हा की याच देशात राहणाऱ्या काही लोकांनी देशातील बँकांना डुबवून अरबो रुपये लुटले व या देशातून ते पळून गेले. खरंच त्यांच्याकडील पैसा जर परत आला असता तर देशात सरकारी उद्योगधंदे उभे राहू शकले नसते काय? परंतु असं झालं नाही. तिसरा मुद्दा आहे तांदूळ व गव्हाचा. सध्या लोकांना निःशुल्क तांदूळ व गहू मिळतो. तो महिन्याला दहा किलो प्रती व्यक्ती असा आहे. तो गरिबांना आहे आणि देशात अशी बरीच कुटुंब आहेत की जे त्याचा लाभ घेतात. परंतु किती प्रतिशत लोकांना त्याचा लाभ मिळतो. देशातील एकुण जनतेपैकी कमीतकमी अंदाजे पन्नास ते साठ प्रतिशत लोकांना त्याचा लाभ मिळतो. मात्र फक्त देशातील वीस टक्के जनताच तेवढी गरीब आणि दारिद्र्य रेषेखालील आहे. बाकीचे नावापुरतेच दारिद्र्य रेषेखालील आहेत. दारिद्र्य रेषेखालील लोकँ म्हणजे नेमके कोण? ज्यांना एकापेक्षा जास्त मुलं आहेत असे, ज्यांच्याकडे पक्की इमारत आहे असे, ज्यांच्या नावावर दोन चाकी गाडी आहेत असे की जे सरकारी नोकरीवर आहेत असे? आजच्या काळात राशनचा लाभ घेणारी मंडळी ही पक्क्या इमारतीत राहतात. चालवायला दोनचाकी गाडी वापरतात. घरात एकच्या वर मुलं आहेत. परंतु राशनच्या दुकानातून गहू, तांदूळ निःशुल्क मिळते म्हणून उचलतात व घरी नेवून इतरांना जास्त दामात विकूनही टाकतात. अलिकडील काळात तर असे तांदूळ, गहू घेणारे लोकँच वस्तीवस्तीतून फिरत असतात. त्याचं काय? राशनचा तांदूळ, गहू त्यांनाच मिळावा. ज्या घरी एकच अपत्य आहे, ते झोपड्यात राहतात, त्यांच्या घरी त्यांच्या नावावर एक सायकल आहे, गाडी नाही. अन् वार्षीक मिळकत एक लाखापेक्षा कमी आहे. तसं पाहिल्यास आज देशात कोणीच गरीब असेल, असं वाटत नाही. हे सरकारलाही एका क्लिकवर दिसतं. तरीही सरकार निमूटपणे लोकांची शहानिशा न करता राशनमध्ये निःशुल्क तांदूळ, गहू देत असतं. अन् यात माहीत जरी झालं की सरकारच्या तिजोरीतून तांदूळ, गव्हाचा अपहार झाला. तरी तो पैसा वसूल केला जात नाही. म्हणूनच सर्रासपणे लोकँ सरकारी योजनेचा लाभ घेत असतात. आज असाच लाभ जीवनधारा विहिर बांधकाम, इंदिरा आवास योजना, विधवा पेन्शन योजना, वृद्ध पेन्शन योजना, अशा कितीतरी योजनेतून जनतेनं मिळविलेला आहे व पैसा लाटला आहे. त्यातच सरकारच्या पैशाचा अपहार केलेला आहे. तोच पैसा वाचला असता तर देशात खरंच सरकारी उद्योगधंदे उभे राहू शकले असते.

आज प्रत्येकजण खावूनपिवून सुखी आहे. त्यामुळं राशनच्या नावावर निःशुल्क तांदूळ, गहू न दिलेला बरा. तोच पैसा वाचवावा व त्यातून उद्योगधंदे निर्माण करावे. म्हणजे बेरोजगारीचा प्रश्न सोडवता येवू शकतो. चवथा मुद्दा आहे, लाडकी बहिण योजना. या योजनेत तर चक्कं प्रत्येक घरातील महिलांनी हातच धुवून घेवून सरकारला लुटले. मात्र सरकारच्या लक्षात आल्यावरही सरकारनं त्यांच्यावर माया करुन त्यांची दया घेतली व कारवाई केली नाही. आज कितीतरी करोड रुपये त्यांना दिले. तेवढ्या पैशातून उद्योग उभे राहू शकले असते. पाचवा मुद्दा आहे, वृद्ध व विधवा पेन्शन योजना. वृद्ध व विधवांना नक्कीच पेन्शन द्यावी. जर त्यांना मुलंबाळं नसतील तर...अलिकडील काळात मुलंबाळं असतात. तरीही ते पोषत नाहीत. असा हवाला दिला जातो. अशांना पेन्शन मागितली जाते व सरकार अशांना पेन्शनही देते. त्यातच सरकारच्या पैशाचा अपव्यय होतो. यात उपाय म्हणजे सरकारनं आपल्या पैशाचा अपव्यय न होवू देता अशा म्हाताऱ्यांना पेन्शन नक्कीच द्यावी. परंतु ती पेन्शन त्यांच्या मुलांच्या मिळकतीतून जबरन वसूल करावी. त्यानंतर वाचलेल्या पैशातून उद्योग उभारावे. तसेच विधवांना पेन्शन देण्याची गरज नाहीच. कारण आजच्या विधवांना मुलं असतात व ती मुलं त्यांना पोषायला समर्थ असतात. जर मुलं लहान असतील तर त्या स्वतःचं उदरभरण करायला समर्थ असतात. काही विधवा तर अशाही आहेत की ज्यांनी आपला दुसरा विवाहही केलेला आहे आणि सरकारकडून पैसाही घेत आहेत. निराधार योजनेचंही थसंच आहे. आधार असलेले कितीतरी लोकँ आजच्या काळात निराधार म्हणून पैसे उचलत आहेत. मात्र कोणाकडेच प्रत्यक्षात जावून चौकशी करायला वेळ नाही आणि गेलेच तर दोन चार रुपये घेवून प्रकरणं दाबून टाकणारेही भरपूर आहेत.देशातील राहणाऱ्या सर्वच लोकांना निःशुल्क पैसे मिळतात. लाडक्या बहिणीच्या नावावर. पेन्शन मिळतं, वृद्ध, विधवा व निराधार म्हणून. कोणाला राशनचा तांदूळ, गहू निःशुल्क मिळतं. कोणी येथीलच पैसा, बँकांना डुबवून विदेशात नेतो. कोणी टॅक्स भरत नाही. अन् सरकारही त्यावर डोळेझाक करुन स्तब्ध पाहात राहातं. प्रत्यक्षात कारवाई करुन शिकँजे कसत नाही. म्हणूनच लोकांची हिंमत वाढलीय लाभ घेवून देशातील पैशाचा अपहार करण्याची. जिथे देशातील नेतेच कितीतरी पैशाचे घोटाळे करतात. तिथं जनतेच्या लहानशा घोटाळ्याचं काय? परंतु अशा सरकारी योजना व त्यातून अपहार करणारे लोकँ सरकारच्या लक्षात येवूनही सरकारचं त्यांना केवळ राजकारणासाठी माफ करीत जाणं. हाच भाग देशातील तरुणाईच्या जीवाशी खेळणारा आहे. देशातील तरुणाईला निःशुल्क राशन नको. त्यांना हाताला काम हवं. जे काम सरकारच देवू शकतं. सरकारी उद्योगधंदे निर्माण करुन. परंतु सरकारनं वरील प्रकारच्या गोष्टी केल्या. प्रत्येक परीवाराला शहानिशा न करता योजना दिल्या. राशन निःशुल्क दिलं वा पेन्शन दिल्या. लाडक्या बहिणींना पैसे वाटप करीत बसले.टॅक्स वसूल केले नाही.

लोकांनी बँका डुबवून पळू दिले तर देशात पैसाच उरणार नाही, उद्योग धंदे उभे करण्यासाठी. मग सुशिक्षित तरुणाईंना काम मिळणार नाही. बेरोजगारी सतत वाढतच जाईल व एक वेळ अशी येईल की काक्रोज जनता पार्टी एक ट्रेलर होतं. ती तरुणाई खवळेल व सरकारलाच एक दिवस नेस्तनाबूत केल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच सरकारनंही त्यावर विचार करावा आणि तरुणाईसाठी नक्कीच लवकर पावलं उचलावीत. विनाकारण पैशाचा होणारा अपव्यय बंद करावा. सरकारी नोकरदाराच्या खिशातून एक दोन दिवसाचाही पैसा काढावा. प्रत्येक नागरिकांकडून टॅक्स वसूल करावा व तरुणाईचा प्रश्न सोडवावा. सरकारी उद्योग धंदे निर्माण करुन. जेणेकरुन तरुण खुश तर देशही खुश व देश खुश तर सरकारही खुश. अन् ज्या देशातील तरुणाई खुश असेल, त्या देशातील जनताही आपोआपच खुश झाल्याशिवाय राहणार नाही. हे तेवढंच खरं. परंतु त्यासाठी सरकारी उद्योगधंदे उभारावेच लागतील. विनाकारण सरकारनं देशातील लोकांना खुश ठेवण्यासाठी सरकारी योजनांचा लाभ देवून मतांसाठी राजकारण करु नये म्हणजे झालं. कारण सध्या देशाला सुशिक्षीत बेरोजगारीची भीषण समस्या सतावत आहे बऱ्याच दिवसांपासून. त्या समस्येत आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


सायं दैनिक नांदेड वार्ता

होय रे भाऊ...फक्त प्यादे पकडून तपास पूर्ण होईल का?

सद्य परिस्थितीत शिक्षण ही प्रक्रिया राज्यकर्त्यांसाठी अडचणीची ठरत आहे.मुले शिकली तर ते स्वावलंबी बनतील, त्यांना खरं खोटे कळेल. वाचन करतील, आपली सद्सद्विवेक बुद्धी वापरतील, इतराना पण ते शिक्षणाचं महत्त्व सांगतील.महत्त्वाचं म्हणजे कुणाच्या भूल थापाना त्यांचा मेंदू बळी पडणार नाही. डोळे बंद करून ते विश्वास ठेवणार नाहीत..शुल्लक कारणावरून एकमेकांना मारणार नाहीत..थोडक्यात यातून गुलाम तयार होणार नाहीत. मग यांना ताब्यात कसं ठेवणार? सोप्पे आहे...सरकारी शाळा बंद करा, शिक्षक संख्या कमी करा, शाळा कॉलेजात प्राथमिक गरजांचा, साधन सामुग्रीचा अभाव ठेवा. कॉम्प्युटर, खेळाचे मैदान, व्यायामशाळा,आधुनिक साधने देऊ नका. शिक्षकांना शिक्षण सोडून इतर कामात गुंतवून ठेवा. खासगी शाळांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवा. यातून कुणी पुढ शिकण्याचा प्रयत्न केलाच तर पेपर फोडा. अभ्यास करून आयुष्यात पुढ जाता येते ही भावना मुलांच्या मनातून काढून टाका. पैशांनीच पदव्या विकत घेता येतात ही भावना वाढीस लावा. खासगी वैद्यकीय महाविद्यालात फक्त पैसा हाच निकष ठेवा.शालेय जीवनापासून दारू गुटका याची रेलचेल ठेवा. धार्मिक गोष्टींचे उद्दातीकरण करा. शिक्षणापेक्षा अंधश्रध्दा वाढली पाहिजे यावर भर द्या. वेगवेगळे मुद्दे उपस्थित करून जनतेला विखुरलेले ठेवा. त्याला त्याच्या भविष्यापेक्षा इतर गोष्टी महत्त्वाच्या वाटल्या पाहिजेत.ही सर्व पद्धतशीर नियोजनाचा भाग आहे.

**- अनंत सूर्यवंशी**

## वाचक लिहितात...

---------

यापूढे पेपर फुटी होणार नाही याची खात्री व्हावी, म्हणजे सामान्य माणूस यामधे भरडणार नाही.- **सुदर्शन कऱ्हाळे**

---------

यात कोणाचेही काहीही होणार नाही,देशातील जनता निर्बुद्ध झाली आहे. हे प्रकरण विसरून जाणार. लगेच मोटेगावकर क्लासेस सुरू पण झाले. काय करावे या पालकांचं.

**- संजय पाटील**

# परीक्षा केंद्र परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषीत

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा नांदेड शहरात रविवार ३१ मे २०२६ रोजी सकाळी १० ते सायं ५ वाजेपर्यंत १८ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहेरील व्यक्तींचा उपद्रव होऊ नये तसेच परीक्षा स्वच्छ सुसंगत वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टिने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम १६३ नुसार ३१ मे रोजी परीक्षा केंद्र परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे. या आदेशानुसार परीक्षा केंद्रापासून ५०० मीटरच्या परिसरात रविवार ३१ मे २०२६ रोजी सकाळी ८ ते रात्री ७ वाजेपर्यंत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवेश करता येणार नाही.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# लाखो रुपये खर्च करुन तयार केलेली भाजी मंडई ओसाड;विक्रेते रस्त्यावरच

धर्माबाद/प्रतिनिधी- धर्माबाद शहराच्या मध्यवस्तीत लाखो रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेली नूतन भाजी मंडई आणि आठवडी बाजार आजही वापराविना ओस पडल्याचे चित्र आहे. नगरपरिषद प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांनी याबाबत ठोस निर्णय न घेतल्याने भाजी विक्रेते आजही बाळापुर रोडवरील मुख्य रस्त्यावरच भाजीपाला विक्री करत आहेत. परिणामी या भागात दररोज तासन्तास वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

विशेष म्हणजे पावसाळ्याची सुरुवात होत असतानाही बाजाराची योग्य व्यवस्था करण्यात आलेली नाही. रस्त्यालगतच्या नाल्यांचे घाण पाणी थेट भाजीपाल्यात मिसळत असल्याने आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. धर्माबाद नगरपरिषदेत मराठवाडा जनहित पार्टीचे नगराध्यक्ष व पंधरा सदस्य, तर भाजपाचे सात सदस्य आहेत. निवडणुकीनंतर बराच कालावधी उलटून गेला असला तरी शहरातील भाजी मंडईचा प्रश्न मात्र अद्याप प्रलंबितच आहे. जुनी भाजी मंडई शहराच्या एका बाजूला असल्याने उर्दू हायस्कूलच्या पाठीमागे नवीन जागा निश्चित करण्यात आली होती. काही दिवस येथे आठवडी बाजार भरविण्यात आला; मात्र पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात चिखल होत असल्याने विक्रेत्यांनी पुन्हा मुख्य रस्त्याचाच आधार घेतला. दरम्यान, शहराच्या मध्यभागी बांधण्यात आलेली नवीन भाजी मंडई अद्याप सुरू न झाल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. सकाळपासूनच मुख्य रस्त्यावर भाजी विक्रेत्यांची गर्दी होत असल्याने वाहतूक विस्कळीत होत आहे. त्यातच या रस्त्यावर चारपेक्षा अधिक दारू दुकाने असल्याने महिला व नागरिकांना मार्ग काढताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेली भाजी मंडई वापराविनाच पडून असल्याने शासकीय निधीचा अपव्यय होत असल्याची टीका नागरिकांतून होत आहे. तसेच अस्वच्छता आणि दुर्लक्षामुळे मंडई परिसरातील ओटे व इतर बांधकामांची दुरवस्था होऊ लागली आहे. नगरपरिषद प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन सर्व भाजी विक्रेत्यांना नव्या मंडईत स्थलांतरित करावे, आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटवून वाहतूक सुरळीत करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

# दलित वस्ती विकास कामात सहायक आयुक्तांचा खोळंबा;माहूर नगर पंचायत आक्रमक

## नगराध्यक्षांसह १४ नगरसेवकांचा आमरण उपोषणाचा इशारा

माहूर/प्रतिनिधी- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विकास कामांना तब्बल सात महिन्यांपासून मंजुरी मिळत नसल्याने माहूर नगर पंचायत प्रशासन आक्रमक झाले आहे. पालकमंत्री अतुलजी सावे यांनी प्रस्तावित कामांना मंजुरी दिल्यानंतर तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करूनही समाज कल्याण विभागाकडून फाईलला हिरवा कँदील मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

संबंधित कामाला ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी सहायुक्त विलंब करीत असल्याने नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी यांच्यासह नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची भेट घेऊन तक्रार मांडली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सहायक आयुक्त समाज कल्याण विभागाला हा विषय तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र त्या सूचनांकडेही दुर्लक्ष करण्यात आल्याचा गंभीर आरोप नगर पंचायत प्रशासनाने केला आहे. विशेष म्हणजे शासन निर्णयानुसार दलित वस्तीतील विकास कामांसाठी संबंधित विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसतानाही मुद्दाम अडथळे निर्माण करून कामे रखडवली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या संदर्भात माहूर नगर पंचायत प्रशासनाने १८ ऑक्टोबर २०२५ नंतर २५ फेब्रुवारी २०२६, २२ एप्रिल २०२६ आणि ८ मे २०२६ रोजी समाज कल्याण विभागाला चार वेळा पत्रव्यवहार केला आहे. दरम्यान समाज कल्याण विभागाच्या पथकाने प्रत्यक्ष स्थळ पाहणीही



केली होती. तसेच संबंधित प्रभागातील घरांची यादी मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने विभागाला सादर करण्यात आली होती. तरीही सहायक आयुक्तांच्या हेकेखोर भूमिकेमुळे विकास कामांना ब्रेक लागल्याचा आरोप करण्यात येत आहे. या रखडलेल्या कामांमुळे दलित वस्त्यांतील रस्ते, गटारी व इतर मूलभूत सुविधा ठप्प पडल्या आहेत. या विरोधात नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी, उपनगराध्यक्ष नाना लाड यांच्यासह १४ नगरसेवकांनी आक्रमक भूमिका घेत २८ मे २०२६ पासून नगर पंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. या निवेदनावर नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी, उपनगराध्यक्ष नाना लाड, सभापती नंदा रमेश कांबळे, विजय कामठकर, मसरत फातेमा अब्दुल रफिक सौदागर, शीला रणधीर पाटील, आशाबाई निरधारी जाधव, सारिका देविदास सिडाम, कविता राजू सौन्दलकर, शकीलाबी शब्बीर सैय्यद, लतिफा मस्तान शेख, सागर विक्रम राठोड, बिलकीसबेगम अहमंदअली शेख आणि अशोक कचरू खडसे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक २०/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शिवाजी पि.दगडु गुटे रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा शुभ्रा पि.शिवाजी गुटे रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव शुभ्रा पि.शिवाजी गुटे रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड या ठिकाणी दिनांक ०८/०६/२०१४ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १४/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - २०/०५/२०२६

स्थळ - कंधार स्वाक्षरित/-

तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक १३/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार मरिफतुंनिसा गौस शेख रा.हतीपुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मरिफतुंनिसा गौस शेख रा.हतीपुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव मरिफतुंनिसा गौस शेख रा.हतीपुरा कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०४/११/१९८८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०६/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - १३/०५/२०२६ स्वाक्षरित/-

स्थळ - कंधार तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक १३/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार सुधाकर माधव तुप्पेकर रा.फुलवळ ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा सुधाकर माधव तुप्पेकर रा.फुलवळ ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव सुधाकर माधव तुप्पेकर रा.फुलवळ जि.नांदेड या ठिकाणी दिनांक २०/०१/१९८९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०७/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - १३/०५/२०२६

स्थळ - कंधार स्वाक्षरित/-

तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक २०/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार सय्यद वसीम सय्यद मोईन रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा सय्यद वसीम सय्यद मोईन रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव सय्यद वसीम सय्यद मोईन यांचा रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २०/०९/१९९६ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १८/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - २०/०५/२०२६ स्वाक्षरित/-

स्थळ - कंधार तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक २०/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार सय्यद मोहसीन सय्यद मोईन रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा सय्यद मोहसीन सय्यद मोईन रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव सय्यद मोहसीन सय्यद मोईन यांचा रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक १४/१२/१९८९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १८/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - २०/०५/२०२६ स्वाक्षरित/-

स्थळ - कंधार तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक २०/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शिवाजी पि.दगडु गुटे रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा शार्विल पि.शिवाजी गुटे रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव शार्विल पि.शिवाजी गुटे यांचा रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड या ठिकाणी दिनांक ०९/०१/२०२१ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १४/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - २०/०५/२०२६

स्थळ - कंधार स्वाक्षरित/-

तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक २०/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार शिवाजी पि.दगडु गुटे रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा शाल्वी पि.शिवाजी गुटे रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव शाल्वी पि.शिवाजी गुटे यांचा रा.महालिंगी ता.कंधार जि.नांदेड या ठिकाणी दिनांक १०/०८/२०१२ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १४/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - २०/०५/२०२६

स्थळ - कंधार स्वाक्षरित/-

तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक १५/०४/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार ऋतिक लक्ष्मण कांबळे रा.येलुर ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा ऋतिक लक्ष्मण कांबळे रा.येलुर ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव ऋतिक लक्ष्मण कांबळे यांनी या कार्यालयात त्यांचा रा.येलुर ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०८/०५/२००७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०८/०४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - १५/०४/२०२६

स्थळ - कंधार स्वाक्षरित/-

तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक २७/०४/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार महेंद्र तुकाराम जाधव रा. लाठ खुर्द ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.महेंद्र तुकाराम जाधव रा. लाठ खुर्द ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव महेंद्र तुकाराम जाधव यांनी या कार्यालयात त्यांचा रा.लाठ खुर्द ता.कंधार या ठिकाणी दिनांक ११/०६/१९९१ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १३/४/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - २७/०४/२०२६

स्थळ - कंधार स्वाक्षरित/-

तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक १३/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार अशोक दत्ता पलेवाड रा. तेलंगवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा अनुसया भ्र.अशोक पलेवाड रा. तेलंगवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव अनुसया भ्र.अशोक पलेवाड रा.तेलंगवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०३/०१/२००८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १२/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - १३/०५/२०२६ स्वाक्षरित/-

स्थळ - कंधार तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक २०/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार बागवान सुमैय्या पि.यूसूफ रा.गोणार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा बागवान सुमैय्या पि.यूसूफ रा.गोणार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव बागवान सुमैय्या पि.यूसूफ यांचा रा.गोणार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २१/०३/२००१ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १८/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - १८/०५/२०२६

स्थळ - कंधार स्वाक्षरित/-

तहसीलदार कंधार

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५६/ज.मृ.नों./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक २०/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार सय्यद मोईन सय्यद दादामिया रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा सय्यद मोईन सय्यद दादामिया रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव सय्यद मोईन सय्यद दादामिया यांचा रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०१/१९४९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १८/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक - २०/०५/२०२६ स्वाक्षरित/-

स्थळ - कंधार तहसीलदार कंधार

# किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती विरुद्ध अविश्वास ठराव दाखल

## मनमानी कारभार,कोट्यवधींच्या मालमत्तेचा सौदा;गोकुंदा जमीन विक्रीवरून वाद पेटला

किनवट/प्रतिनिधी- कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीसह चौदा संचालकांना सभापतींनी विश्वासात न घेता मनमानी कारभार करीत असल्याचा घणाघात २५ मे रोजी नांदेडच्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे दाखल केलेल्या अविश्वास प्रस्तावपत्रात केला आहे. याच बाजार समितीची गोकुंदा येथील करोडो रुपयांची मालकी स्थावर जंगम मालमत्ता नियमावलीत बसवून कवडीमोल भावाने विक्री करून बँकेत मुद्दत/स्थायी ठेव (एफडी) रक्कमेत संचालक मंडळाला विश्वासात न घेता एक कोटी एकसष्ठ लाख रुपये सभापती आणि सचिवांनी परस्पर हडपल्याने त्यांच्यावर विश्वास राहिलेला नसल्याने सात दिवसांत विशेष सभा घेण्याचा मुद्दा सदरहू पत्रात नमूद केलाय हे विशेष.

मुळात मागील दहा महिन्यांपासून सभापती आणि सचिवांनी मासिक सभा घेण्याचे संचालक मंडळाने सांगितल्यानंतरही टोलवले असेल तर उपसभापतींनी तातडीची बैठक का बोलावली नाही असा प्रतीप्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. समितीचे सर्व रेकॉर्ड सचिवांच्या ताब्यात कुलूप बंद केल्याने हे चौदा संचालकँ हतबल झाले आहेत. मागील खरिप हंगामातील समितीने खरेदी केलेल्या सोयाबीनचे चुकारे थकल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु मागील महिन्यात वादळ उफाळल्यानंतर सर्वांच्या साक्षीने दस्तुरखुद्द सभापतींनी शेतकऱ्यांचा बटवडा केलाय, त्यामुळे संचालकांच्या याही आरोपातील तथ्य समोर आले आहे. दहा महिन्यांपासून किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मासिक बैठका झाल्याच नसतील तर जिल्हा उपनिबंधकांनी या बाबींची गंभीर दखल घेऊन संचालक मंडळच बरखास्त करून प्रशासक नेमण्याची तरतूद असेल तर त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या मागणीने जोर धरलाय. राहुल गेमसिंग नाईक किनवट, सोपानराव ज्ञानोबा केंद्रे बोधडी बु., अनिल संभाजी कऱ्हाळे कमठाला, श्रीराम माणिकराव कांदे पाथर्डी खुर्द, सुनील लक्ष्मण घुगे बोधडी बु., प्रल्हाद तुकाराम सातव मोहपूर, प्रेमसिंग बदलू साबळे डोंगरगावतांडा, प्रेमसिंग रामजी जाधव अंबाडीतांडा, बालाजी गोविंद बामणे मलकवाडी, शेख हैदर शेख मुसा गोकुंद्दा. राजू लक्ष्मण सुरोशे घोटी, कैलास अशोक बिजमवार बोधडी बु., अब्दुल सत्तार अब्दुल रमजान किनवट, सौ.विद्या संतोष दासरवार किनवट यांच्या शिष्टमंडळाने जिल्हा उपनिबंधकांकडे अविश्वास प्रस्ताव सादर केलाय. उपनिबंधकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. सभापती पदाच्या उलथापालथीनंतर उरलीसुरली बोधडी बु.येथील पाच एकर जमीन, मांडवी तीन एकर, किनवट येथील साडेतीन एकर जमीन आणि वखार महामंडळाच्या रोडला साठ आर जमीन वाचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. ज्या उद्देशाने गोकुंद्दा येथील सर्वे नंबर १७८ क्षेत्र आडीच एकर जमीन विकली कालांतराने त्यावर रक्कम खर्ची लावली असती तर असे प्रसंग उद्भवले नसते. गोकुंदा येथील जमीन विकण्याचे प्रयोजन काय होते? बँकेत मुद्दत, स्थायी गुंतवणूक करण्यापेक्षा जमिन ठेवली असती तर आज समिती आज मालमत्तेच्या दृष्टीने श्रीमंत राहिली असती अशा प्रतिक्रिया उमटताना दिसतात.

## रा.काँ.च्या बैठकीत खा.तटकरे आक्रमक

मुंबई/प्रतिनिधी-माजी मुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या काल झालेल्या बैठकीत प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे चांगलेच आक्रमक झाले होते. त्यानंतर मोठ्या राजकीय घडामोडींना वेग आला असून, पक्षाकडून लवकरच सुधारित कार्यकारिणीची नवी यादी भारत निवडणूक आयोग यांच्याकडे पाठवली जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. काल मुंबईतील देवगिरी या निवासस्थानी झालेल्या बैठकीनंतर पक्षातील नाराजी उघडपणे समोर आली होती. या बैठकीत सुनील तटकरे यांनी आपली नाराजी स्पष्ट शब्दांत मांडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती.

# सुकळी येथील गोरक्षक हत्या प्रकरणी सहा जणांना अटक

उमरखेड/प्रतिनिधी-गोवंश तस्करी रोखण्यासाठी पाठलाग करणाऱ्या बजरंग दलाच्या ३२ वर्षीय कार्यकर्त्याची गोवंश तस्करांनी दगड व लाकडी काठ्यांनी क्रूरपणे अमानुष हत्या केल्याची संतापजनक घटना २३ मेच्या रात्री साडेअकराच्या सुमारास उमरखेड तालुक्यातील सुकळी (ज) येथे घडली होती. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली होती. याप्रकरणी पोलीसांनी सहा जणांना अटक केली आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्ष्यात घेऊन यवतमाळ जिल्हा पोलिस अधीक्षक व अप्पर जिल्हा अधिक्षक यांनी घटनेच्या दिवसापासून आरोपी अटक होईपर्यंत उमरखेड येथे तळ ठोकला होता.या कामी उमरखेड पोलीसांचे तीन पथक तर एक पथक महागाव पोलीस स्टेशनचे यास सोबत म्हणून स्थानिक गुन्हे शाखेचे सर्व पथक फरार आणि निष्पन्न आरोपींचा विविध तांत्रिक बाबी अवलंब करून शोध घेत होते, यासाठी शिताफीने साफळा रचत तातडीची कारवाई करत पोलीसांनी २५ मे रोजी पाच मुख्य आरोपीला तर २६ मे रोजी एका आरोपींला ताब्यात घेऊन त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना २९ मे पर्यंत चार दिवशाची पोलीस कोठडी सुनावणी आहे. शेख सुलतान शेख अल्लावली वय २७, रा.सुकळी, मोहम्मद परवेज मोहम्मद शफी वय २४, रा. रहीम नगर उमरखेड, नोमनोद्दीन रियाजोद्दीन काझी वय २०, रा. सुकळी, शेख असगर अहमद अब्दुल हमीद वय २८, रा. सुकळी, नुरोद्दीन इक्रमोद्दीन काझी वय ३०, रा. सुकळी, मोहम्मद अरबाज मोहम्मद शफी वय २२, रा. उमरखेड असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उमरखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ पुढील तपास करीत होते. या घटनेनंतर सुकळी, महागाव आणि उमरखेड परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी संवेदनशील भागात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून खा.नागेश पाटील आष्टीकर यांचे सुपुत्र युवा सेनेचे पदाधिकारी कृष्णा पाटील आष्टीकर यांनी आपला उमेदवारी अर्ज आज (बुधवार) जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे दाखल केला आहे.

# पेट्रोल पंपावर तहसीलदारांचा रात्रभर मुक्काम ;इंधन टंचाईत प्रशासन सतर्क

माहूर/प्रतिनिधी- तालुक्यात सध्या पेट्रोल आणि डिझेल टंचाईची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून त्याचा सर्वाधिक फटका खरीप हंगामाच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांना बसत आहे. मशागतीची कामे वेगाने सुरू असताना डिझेल अभावी अनेक ट्रॅक्टर जागच्या जागी उभे राहिले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. अनेक गावांमधून शेतकरी ट्रॅक्टर घेऊन रात्रीपासूनच पेट्रोल पंपांवर रांगा लावत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर माहूर शहरातील दोनपैकी एका पेट्रोल पंपावर तब्बल दोन दिवसांनी डिझेलचा टँकर पोहोचताच मोठी गर्दी होण्याची शक्यता निर्माण झाली होती. संभाव्य गोंधळ, नागरिकांचा रोष आणि कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी तहसीलदार अभिजीत जगताप यांनी स्वतः पुढाकार घेत थेट पेट्रोल पंपावरच रात्रभर मुक्काम ठोकला. दि.२६ मे रोजी रात्री आठ वाजल्यापासून ते मध्यरात्री दोन वाजेपर्यंत तहसीलदारांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत इंधन वितरण प्रक्रिया सुरळीत पार



पाडली. यावेळी महसूल विभागासह पोलीस प्रशासनही मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाच्या सतर्कतेमुळे गर्दी नियंत्रणात राहिली आणि शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांना संयमाने डिझेल उपलब्ध करून देण्यात आले. विशेष म्हणजे, शेतकऱ्यांना प्राधान्य मिळावे यासाठी टिप्पर आणि जेसीबी वाहनांना तात्पुरते डिझेल न देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. त्यामुळे ट्रॅक्टर आणि चारचाकी वाहनधारकांना तुलनेने पुरेशा प्रमाणात डिझेल मिळाल्याने काहीसा दिलासा मिळाला. सध्या तालुक्यातील बहुतांश पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी लांबच लांब रांगा लागत असून काही ठिकाणी इंधनाचा साठा काही तासांतच संपत आहे. खरीपपूर्व मशागतीसाठी ट्रॅक्टर, रोटाव्हेटर आणि इतर कृषी यंत्रांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी नंबर लागू नये म्हणून ट्रॅक्टरवरच झोपून रात्र काढल्याचे सांगितले. दोन दिवसांपासून मशागत बंद आहे. पाऊस येण्याआधी शेत तयार करायचं आहे, पण डिझेल नसल्याने ट्रॅक्टर उभे आहेत, अशी व्यथा अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# चिखलवाडीत पाणीपुरवठा पाईपलाईन गळतीमुळे नागरिक त्रस्त

नांदेड/प्रतिनिधी- चिखलवाडी परिसरामध्ये सुरू असलेल्या नवीन रस्त्याच्या कामादरम्यान पिण्याच्या पाण्याच्या मुख्य पाईपलाईनला मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने परिसरातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. लाटकर कॉम्प्लेक्सच्या पुढे (प्राणदा फिटनेस फिलोशीप जवळ) मुख्य पाईपलाईनला गळती लागल्याने मोठ्या प्रमाणात पिण्याचे पाणी वाया जात असल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे.

या गळतीमुळे संपूर्ण चिखलवाडी भागात अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून आधीच दोन-तीन दिवसांनी होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांची गैरसोय वाढली आहे. अनेक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून भविष्यात रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच सदर पाईपलाईन फुटल्यामुळे रस्त्यावरील घाण पाण्यात मिसळून दुर्गंधीयुक्त पाणी येण्याचा धोका निर्माण झाला असून नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर चिखलवाडी परिसरातील नागरिकांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त यांना निवेदन देऊन संबंधित पाईपलाईनची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी तसेच दुरुस्ती पूर्ण झाल्याशिवाय रस्त्याचे काम पुढे नेऊ नये, अशी मागणी केली आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील चौथे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष : के.बी.सोनवणे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४१५/२०२६

अर्जदार : १. रुपाली भ्र.साईनाथ पालदेवार रुपाली पि.गोपाल कोटलवार वय : २९ धंदा : घरकाम रा.मांजरम ता.नायगाव जि.नांदेड ह.मु.महेबुब नगर, नांदेड ता.जि.नांदेड मो., सुप्रिया भ्र.उमाकांत करकेलवार सुप्रिया पि.गोपाल कोटलवार वय : २६ धंदा : घरकाम रा.जाभळी ता.मुखेड जि.नांदेड मो.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ व ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ व २ ही मयताच्या मुली आहेत. मयत नामे गोपाल पि.रामचंद्र कोटलवार यांचा मृत्यू दि.१८/०२/२०२६ रोजी झालेला आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशीर वारस नसल्याचे अर्जदारानी अर्जात कथन केले आहे. अर्जदारांनी मा.न्यायालयात अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दि.१६/०६/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दि.०२/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व मा. न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| **कनिष्ठ लिपीक** | स्वाक्षरित/- |
| सह दिवाणी न्यायालय | **स.अधिक्षक** |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **SHIRSATH BINA POPATRAO** which now I am, changing as (new name) **DEEPALI LILADHAR KAPASE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**DEEPALI LILADHAR KAPASE**
R/o h.no.9, Ami raw house b/h income tax quters om colony, uttamnagar Ambad
Dist.Nashik-422010
M.No.-9371193777

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय देगलूर
प्रशासकीय इमारत शिवाजी पुतळ्याजवळ,देगलूर
पिन कोड-४३१७१७

जा.क्र.२०२६/जन्म-मृत्यु/कावी-५६ दिनांक २६/५/२०२६

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.डोंगळे संतोष सुरेशराव रा.करडखेडवाडी ता.देगलूर येथील असून त्यांनी या कार्यालयात त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

१. जन्म झालेल्याचे नाव- श्री.डोंगळे संतोष सुरेशराव

सदर व्यक्तीचा करडखेडवाडी या ठिकाणी दिनांक २३.०६.१९९१ या दिवशी जन्म झाला आहे.

सदर व्यक्तीचा जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणकरीता दिनांक १०.०३.२०२६ रोजी तहसिल कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे.


वरील जन्म दिनांक, स्थळ व व्यक्तीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय देगलूर येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक-
स्थळ-

स्वाक्षरित/-
निवासी नायब तहसिलदार
महसूल-१ देगलूर.

# बिसमितकौर निर्मले हीचे दहावी बोर्डातून यश

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील रहिवाशी असलेले मंत्रालयाचे सेवानिवृत्त सहसचिव स. देवेंद्रसिंघ निर्मले यांची नात कुमारी



बिसमीतकौर सुकन्या ॲड. इंदरपालसिंघ निर्मले हीने दहावी अंतर्राष्ट्रीय शिक्षण बोर्ड मुंबई येथून मोठे यश संपादन करीत ८८ टक्के गुण मिळवले आहेत. बिसमीतकौर ही त्रिनिटी इंटरनॅशनल स्कूल मुंबई येथील विद्यार्थिनी आहे. तसेच नवज्योत फाउंडेशन नांदेडचे अध्यक्ष स. नौनिहालसिंघ जहागीरदार यांची ती नात आहे. तिच्या यशाबद्दल नांदेड येथील शीख समाजात आनंद व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

## माजी मुख्यमंत्र्यांच्या घरावर...

इन्व्हेस्टिगेशन ऑफिसकडूनही या व्यवहारांची स्वतंत्र चौकशी सुरू आहे. विजयन सरकारच्या कार्यकाळातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील प्रकरणांपैकी हे एक प्रकरण मानले जात आहे.दरम्यान, मंगळवारी पिनाराई विजयन यांच्या सुरक्षेत तैनात असलेल्या गनमॅनसह पाच पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी एम. आर. अजित कुमार यांच्यावरही कठोर कारवाईची तयारी राज्य सरकारने सुरू केली आहे. तपासात अडथळा आणल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.विशेष तपास पथकाच्या अहवालानुसार, डिसेंबर २०२३ मध्ये अलाप्पुझा येथे झालेल्या नव केरळ यात्रादरम्यान आंदोलन करणाऱ्या युवक काँग्रेस आणि केएसयू कार्यकर्त्यांवर पोलिसांनी बेकायदेशीरपणे बळाचा वापर केल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

पान १ वरुन

## जीवनशैलीत महत्वाचे...

केले.समाजातील परस्पर सहकार्य आणि मानवतेचे महत्त्व अधोरेखित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, एखाद्या तहानलेल्या व्यक्तीला एक ग्लास पाणी देण्याची सवय प्रत्येकाने लावून घेतली पाहिजे. तसेच, घराबाहेर किंवा दुकानांबाहेर माठातील थंड पाण्याची व्यवस्था करणाऱ्या नागरिकांचे त्यांनी मनापासून कौतुक केले.मुक्या जीवांप्रतीही संवेदनशीलता दाखवण्याचे आवाहन करताना पंतप्रधानांनी नागरिकांना पक्षी आणि इतर प्राण्यांसाठी पाण्याची छोटी भांडी घराबाहेर, बाल्कनीत, गच्चीवर किंवा दुकानांबाहेर ठेवण्याचे आवाहन केले. उष्णतेच्या या कठीण काळात केवळ मानवांच्याच नव्हे, तर सर्व सजीवांच्या संरक्षणासाठी करुणा आणि संवेदनशीलता जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान, वाढत्या तापमानामुळे अनेक राज्यांमध्ये नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, आरोग्य विभागाकडूनही नागरिकांना दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळण्याचा सल्ला दिला जात आहे.

## असरजन नाका ते वाघाळा...

ड्रेनेज खोदल्यावरची काळी माती रोडवर पसर करून सोडण्यात आल्यामुळे परिसरातील अनेक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असुन रस्त्यामध्ये वाहने अडकून पडणे, खड्डेमय रस्त्यामुळे टिपर, मोठे मोठे वाहने गेल्याने रस्त्यावर अडकून पडणे यासह अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. या बाबत मनपा आयुक्त व लोकप्रतिनिधी तसेच शारदा कन्स्ट्रक्शन व महानगर पालिकेतील संबंधित विभागाचे अधिकारी यांना वारंवार निवेदनाद्वारे कळविण्यात आले असून अद्यापही याकडे दुर्लक्ष करण्यात आले असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. चांगला असलेला डांबरीकरण रस्ता ड्रेनेजमुळे खोदल्यामुळे खराब झालेला असून सदरचा रस्ता पूर्ववत करणे कोणाचे काम आहे. या बाबीकडेही लक्ष देण्यात यावे, पावसाळा सुरू होत असून या पावसामुळे मात्र नागरीकांचे बेहाल झाले आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४